## मला माझ्या समाजात जन्म घेतल्याचा अभिमान आहे :

१. कारण, या माझ्या समाजामधें, स्वतःचं जीवन जे भल्या मार्गाने, सत्त्वसंपन्नतेनें जगतां येणं शक्य असतं, तें लबाडीने व नाटकीपणें जगत रहाणारांची संख्या नगण्य आहे.

२. दुस-याच्या घराण्यासह, त्याच्या उपजातीवर मनगढंत आरोप करून, त्या संपूर्ण समाजाचं मानसिक खच्चीकरण करून [स्लेजिंग] अप्रत्यक्षपणें आपण वेगळे व मोठे सद्गुणी आहोत; असें भासवणारा विषाक्त दुर्गुण या समाजात नाही.

३. अत्यंत सरळ आणि स्वच्छ बुद्धीच्या या लोकांनी संख्येनं ऐंशीच्या वर आणि गुणवत्तेनं श्रेष्ठ दर्जाचे माध्यमांचे सम्पादक दिलेले असूनही, दुस-या एकाही समाजावर किंवा उपजातीवर आडून वारकरण्याचें, त्यांच्या विरुद्ध गूढप्रचार करत राहण्याचं यांच्या मनातही आलं नाही.

४. नातेसंबंध जोडल्यावर विसरून जाण्याची कला या उपजातीला साधली नाही. फायद्यापुरता संबंध ठेवणे या जातीला जमत नाही. नाते संबंधात माधुर्य ही खासियत. होतकरू आणि नक्की सुस्थितीत जाणा-या जावयाला त्याच्या घरापासून युक्ति-प्रयुक्तीने तोडणें किंवा तसा प्रयत्न करणें; हे या समाजांत गर्हणीय समजतात.

५. नाते संबंध किंवा मैत्रीचे संबंध जोडणे आणि कोणताही स्वार्थ सम्पादन न करतांही ते जपणं हे एक कठीण व्रत या समाजात सहज स्वभावासारखं पाळलं जातं.

६. लादलेल्या नव्हे तर स्वतःच्या अंगभूत सहजभावातल्या गुणांमुळे या समाजातल्या लोकांना पराभूत करतां येणार नाहीं; हें समजल्याबरोबर, या समाजातील गुणश्रेष्ठ व्यक्तींचं व समाजाचंही गूढ रीतीनें खच्चीकरणाचं काम होऊनही इतर समाजातल्या लोकांशीं तुलना करतां, ते कोठेच कमी पडले नाहीत.

७. गुणी लोकांना कम-अस्सल ठरवून माध्यमांच्या साहाय्याने, अनेक ठिकाणांहून; आपल्या नावाचा राजकारणी डांगोरा पिटवून सतत लोकांपुढे येत रहाण्याचे आणि त्यामुळे वाढणारा सुजेसारखा खोटा अभिमान आणि खोटी प्रसिद्धी मिळवून जात्यभिमान जोपासण्याचें तंत्र आणि गूढमंत्र शोधणें यांनीं कम-अस्सल मानलें.

८. 'जावयाला मारणारे' यासारखे आधारहीन खोटे आरोप हेतुपूर्वक, सतत, गूढरीतीने करणारे लोक भोवती असूनही त्याला उत्तर म्हणूनही या समाजाने पुतण्याला मारणारे, श्रीमंत विधवांना गाडून मारणारे, आजी, पत्नी, पतीनां मारणारे असे इतर समाजाला कधीही म्हटले नाहीं.

९. क-हाड्यांची इतिहासकाळांत तीन - तीन स्थलांतरं होऊनही; परिस्थिती संबंधीची दूरदृष्टी आणि परिस्थितीचं यथार्थ आकलन आणि पूर्वानुमान यामुळें हिंसाचाराच्या वणव्यातही त्यांचे नुकसान झालें नाहीं.

१०. क-हाड्यांचे स्थलांतर, निराधार, निर्वासित आणि शरणार्थींनां नेहमीं जसें क्लेशकारक होतें तसें म्हणूनच झालें नाहीं.

११. या गुणांमुळेंच स्थलांतरितांमध्ये येणारे अति - अति काटकसर, अति - सावधपणा आणि चिकटून रहाण्याचा गुण क-हाड्यांमधें विशेष निर्माण झाला नाहीं. या गुणांमुळेंच तर कांही वेळां शोभूनही दिसणारी अहंमन्यता क-हाड्यांमधें आलेली आहे.

१२. शूर योद्धे; समर्थ प्रशासक, दूरदृष्टीचे, परिस्थितीचें सर्वांच्या आधीच सर्वांगीण आकलन होणारे, लोभसवाण्या व्यक्तिमत्त्वाचे, दरबारी जिंदादिली असलेले असे क-हाडे आहेत. राजकारणं करून - खोट्या नाट्या कुभांड रचण्यामुळे नव्हे; तर स्वयंभू गुणांच्यामुळें तसेच स्वकर्तृत्त्वानें क-हाड्यांनी समाजांत अनेक क्षेत्रांत प्राथम्य मिळवलं व मानाची पदं मिळवली.

१३. देशस्थी बडेजाव व कोकणस्थी काटकसर यांचा सुवर्णमध्य क-हाड्यांत दिसतो. स्थलांतरांमुळें टापटीप आली. अनेक गुणांचा सुवर्णमध्य क-हाड्यांमधें दिसतो. फारगोरे नाहीत, फार काळे नाहीत - इष्टतमता ही क-हाड्यांची खासियत आहे.

१४. कोणत्याही गोष्टींचा अतिरेक वा आततायीपणा क-हाड्यांत नाहीं. फार उंच, फार ठेंगू नाहीत, फार कंजूष किंवा फार उधळे नाहीत.

१५. अजात शत्रू व्यक्तींचे प्रमाण क-हाड्यांमधें बरेंच आहे.

१६. दरबारी ऐट, रसिकता, सहृदयता, जिंदादिली, मनमोकळेपणा, जीवनाबद्दल निर्धास्तपणा, आत्मविश्वासी दृष्टिकोण क-हाड्यांतच पहावा.

१७. 'तुटे वाद संवाद तो हीतकारी' हे कौशल्य क-हाडे ब्राह्मणांत दिसून येते.

१८. विविध क्षेत्रांत अग्रगण्य, कर्तृत्ववान् सदाचारी असा हा ब्राह्मण समाज. त्यांचा उज्ज्वल इतिहास विशाल भारताच्या राष्ट्रीय एकात्मता निर्मितीमधें उल्लेखनीय भर घालणारा आहे.

|| श्री ||

भाषण - **क-हाडे ब्राह्मण महासङ्घ, ठाणें अधिवेशन - १६.१२.२००१.**

ब्राह्मण = व्युत्पत्ति = √बृह् = विस्तारकरणें + √अन् = श्वासोच्छ्वासकरणें

= Thinker, Philosopher, contributing great thoughts useful for the gracefull existance of the community / society.

= सदैव विस्तार होत जाणा-या या विश्वाच्या मूळ कारणाचा विचार ज्याच्या सततच्या श्वासोच्छ्वासांतही आहे - म्हणजे जो तत्वज्ञानी, विचारवंत - आहे.

= श्रोत्रिय, अवृजिन, अकामहत, शान्त, अहैतुकदयासिन्धु असा ब्राह्मण आज........ कुठंय?

= धर्मं चरत माऽधर्मं सत्यं वदत माऽनृतम् !
दीर्घं पश्यत मा ह्रस्वं परं पश्यत माऽपरम् || वसिष्ठधर्मसूत्र

= ब्राह्मणं पुरोदधीत - विद्याभिजन वाग्रूप वयः शीलसम्पन्नं
न्यायवृत्तं तपस्विनम् | गौतमधर्मसूत्र २.२.१२

= दया, क्षान्ति, अनसूया, शौच, अकार्पण्य, अस्पृहा, मंगल -
गोष्टींचंच आचरण करणारा, हानिकारक गोष्टी न करणारा; विद्वान, सदाचारी, संयमी, गुणवान् ...... हवा. - गौतमधर्मसूत्र

= आचरणच्युत माणसाला जेवायलाही बोलावूं नये. - गौतमधर्मसूत्र

= म्हणूनच एकाद्या अपराधाला दण्डाचं प्रमाण सांगतांनां मनूने सांगितलं
शूद्राच्या दुप्पट वैश्याला, वैश्याच्या दुप्पट क्षत्रियाला तर क्षत्रियाच्या दुप्पट ब्राह्मणाला दंड करावा.

**कालौघात कांही ब्राह्मणांनी कमावलेले खाली दिलेले दोष, आपणाला चिकटतां कामा नयेत यासाठीं आपण दक्ष राहूं या !**

- अहंकारी - अहंकार सुद्धा कुपोषित व अव्यवहारी.
- आपमतलबी - फायदा साधेपर्यंतच संबंधांनां जपणारे.
- अध्यस्तमनांचे - कंडिशण्ड मनांचे.
- आक्रस्ताळेपणा, उद्धटपणा, शांत स्वभाव घालवून बसलेले.
- लघुदृष्टीचे आणि भीतिग्रस्त बेगुमानपणा, दर्जाचा लोप झालाय.
- दुतोंड्ये, ढोंगीपणा वाढलाय.

- सहज - खोटारडेपणाला जपणारे, वाईट गोष्टींनां तात्त्विक मुलामा देण्याचें कसब साधलेले,
- नको तिथं कडक (Flexibility घालवून बसलेले).
- दोष काढत रहाणारे, पण प्रसंगी स्वतः लाचार.
- आपल्या पोझिशनचा लाभ इतरांना न मिळू देण्यांत गुण मानणारे.
- परनिंदेचं व्यसन जडलेले, आळशीपणा, मत्सरभावना व असूयाबुद्धी असलेले,
- स्वगुणांनी मोठे झालेल्या लोकांचे किंचितसे अवगुणही मोठे करून सांगण्यांत प्राविण्य संपादन केलेले.
- लबाडीमधें प्राविण्य; दुस-याला नुकसान पोचविण्याच्या कार्यात आवड.
- हेतूंचा विपर्यास करण्यांत बुद्धी वापरणारा. स्वच्छ बुद्धीचा वापर कमी; अध्यस्त मनांचा वापर जास्त करणारे.
- बव्हंशी बुद्धी - उसनवारीची, लादलेली, संवयीची, नटासारखी - अनुकरण करण्यात प्रवीण, भारवाही
- - म्हणजे बुद्धीचा आभास निर्माण करणारी - आहे परंतु खरी नव्हे - **Deceptive and not true.**
- ख-या स्वत्त्वाची ओळख विसरलेले - आणि अहंमन्य स्वभावाचे.
- स्वाभिमान विसरलेले; विचार करून निर्णय घेण्याची कुवत घालवलेले.
- कल्पनांची आवर्तनं राहोत - पण साध्या कल्पनाही ज्यांच्यांत उत्पन्न होत नाहीत असे.
- अनुदार, चीड आणणा-या स्वभावाचे, स्वकेंद्रित वृत्तींचे, उदास, थबकून रहाणें. पसंत असणारे, अप्रामाणिक, नकारात्मक विचारांचे, गंभीर चेहरा करून असणारे.
- दादा लोकांशी नको तेवढी सलगी तर गुणी लोकांवर दादागिरी.
- स्लेजिंगच्या कलेत प्राविण्य संपादन केलेले.
- भांडखोरपणाची कला अवगत झालेले.
- आपला शोध आपल्यामधेंच शिरून घ्यायला विसरलेले.

## आपणाला हे करणें आवश्यक आहे :-

- आपल्यावरचा उदंडविश्वास, आपणच जागवायला हवाय - **Insight**
- जबाबदारी घेऊन ती पेलण्याचा आपला सहज स्वभाव वाढवायला हवाय - **Inetiative**
- लोकांनाही स्फूर्ति मिळेल असा आपला स्वभाव हवाय - **Inspiration**
- स्वीकारलेल्या कार्यात झोकून देण्याची वृत्ति वाढवायला हवी आहे - **Involvement**
- कांही नवनिर्मितीसाठीं माझी बुद्धी मला वापरावयाची आहे याचं भान - **Improvision**
- अनुयायित्वांत मश्गूल न होतां स्वतःचं स्वतंत्र व्यक्तिमत्त्व समजून - उमगून तें वाढवायचंय - **Individuality**
- कृतिप्रवणता आणि चिकाटी याबरोबरच, माझ्यामधे उच्च मानवीय गुणवत्ता मला वाढवायची आहे. **Implementation**
- माझं स्वत्त्व मला शोधायचंय, सद्‌गुण वाढवायचे आहेत. स्वतःचं व्यावहारिक नव्हे आध्यात्मिक स्वरूप मला जाणून घ्यायचेंय आणि मनाच्या हेलकाव्यांबरोबर जगण्याची संवय सोडायची आहे. यासाठीं मला, माझी वंशदत्त स्वच्छ बुद्धी उपयोगी पडेल. **Spirituality**

**क-हाड्यांनी आपली नावं अधोरेखित केलेली क्षेत्रं.**

श्री. अवधूत हर्डीकरांनी मिळवलेल्या अशा नावांची संख्या पुढे आहे,
आपणालाही यांत भर घालता येईल.
आपणाला माहित असलेली नांवे कृपया श्री. अवधूत हर्डीकरांना पाठवावीत.

| क्षेत्र | आतापर्यंत उपलब्ध संख्या |
|---|---|
| १. आध्यात्मिक | ३६ |
| २. वेदविद्या | २३ |
| ३. संस्कृतविद्या शाखांमध्यें पांडित्य | ३९ |
| ४. भारतीय विद्या | १९ |
| ५. वृत्तपत्र सम्पादक | ८७ |
| ६. साहित्यिक - कविश्रेष्ठ | ६१ |
| ७. नाटककार - नाटकपद्यकार | ९ |
| ८. गवई - गायक | ५५ |
| ९. तबला वादक | १५ |
| १०. म्यूझिक कंपोझर्स | १३ |
| ११. सिने नाट्य क्षेत्रातले नट-नटी | ३३ |
| १२. सिने नाट्य दिग्दर्शक - वितरक | २० |
| १३. सांस्कृतिक - धार्मिक क्षेत्र | १२ |
| १४. शिक्षण शास्त्रज्ञ | ३६ |
| १५. ख्यातनाम धन्वन्तरी | २७ |
| १६. इतिहासकार | ९ |
| १७. क्रीडा | ४१ |
| १८. न्यायाधीश | १५ |
| १९. वैमानिक | ११ |
| २०. आयुर्वेदनिष्णात - कारखानदार - संस्था चालक | २० |
| २१. चित्रकार | १३ |
| २२. प्रकाशक | १२ |
| २३. ज्योतिषशास्त्रवेत्ते | ५ |
| २४. रणांगणात ख्याति | २५ |
| २५. राजकारण | ३२ |
| २६. वैज्ञानिक आणि गणिती | १५ |
| २७. कामगार - पुढारी | ७ |
| २८. प्रवचनकार - कीर्तनकार | १७ |
| २९. उद्योजक - कारखानदार | ४५ |
| ३०. बिल्डर्स् | ११ |
| ३१. मॅनेजमेंटशास्त्र विशारद | ६ |
| ३२. शासकीय - निमशासकीय सेवेतील ॲडमिनिस्ट्रेटर्स | ४३ |
| ३३. संस्थानिक | ५ |

३४. ख्यातनाम विचारवंत .................................... ५२
३५. व्हाइस चॅन्सेलर्स् .................................... ५
३६. वृत्तपत्रविद्या अध्यापक .................................... ७
३७. वृत्तपत्रांत उच्चपदांवर कार्य केलेले (पण संपादक नव्हेत) .................................... २९
३८. क्रीडा क्षेत्रातले अंपायर्स .................................... ३
३९. पक्षिप्रेमी, पर्यावरणप्रेमी, निसर्गप्रेमी - अभ्यासक .................................... ५
४०. गाजलेली क-हाडा स्त्री .................................... ६४
४१. चार्टर्ड अकाउण्टंट्स् .................................... ६
४२. खासगी कंपन्यातले वरिष्ठ अधिकारी .................................... १२
४३. वकील .................................... १९
४४. आर्किटेक्ट्स् .................................... ९
४५. चित्रपट कथाकार .................................... ४
४६. जाहिरात क्षेत्र .................................... ८
४७. पपेट शो - मिमिक्री .................................... ३
४८. आमदार - खासदार - नामदार .................................... १७
४९. नृत्य, कला विशारद .................................... २
५०. भारतीय हायकमिशनर .................................... ५
५१. संग्राहक .................................... २
५२. खगोल शास्त्रज्ञ .................................... २
५३. स्वातंत्र्यासाठी जीवन वेचलेले .................................... १९
५४. भारतसरकारचे सन्मानपात्र .................................... १४
५५. मनोवैज्ञानिक .................................... २
५६. हार्मोनियमवादक .................................... ४
५७. विज्ञान कथा लेखक .................................... ६
५८. केटरर्स .................................... ४
५९. कॉश्च्यूम डिझायनर्स .................................... २
६०. अर्थशास्त्रज्ञ .................................... ४
६१. समीक्षक .................................... ७
६२. दिवाण .................................... ४
६३. समाजसेवक .................................... १०
६४. कोशकार .................................... २
६५. तत्त्वज्ञान .................................... ४
६६. अनेक क्षेत्रांमध्ये प्रथम .................................... ३४
६७. विख्यात क-हाड्यांचे प्रख्यात चेले .................................... १०
६८. मोठी हॉटेल्स् - मंगलकार्यालये - उपहारगृहें यांचे मालक .................................... १९
६९. क-हाड्यांनी उभारलेल्या लोकोपयोगी संस्था .................................... ५७
७०. क-हाड्यांची हॉस्पिटलस् .................................... १४
७१. क-हाड्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ ठेवलेले पुरस्कार / ॲवार्डस् / स्पर्धा / खेळ इ. .... २७
७२. क-हाड्यांच्या नावांवर स्थापलेल्या संस्था .................................... ६६
७३. कर्तबगार क-हाड्यांच्या नावाचे स्टॅम्पस् भारतसरकारने काढले -
अशा व्यक्ती व क-हाड्यांच्या संस्था .................................... ११
७४. व्यक्ती एक क्षेत्र अनेक असलेली क-हाडा व्यक्ती .................................... १४
७५. एखादं कार्यक्षेत्र आठवल्याबरोबर आठवणारी क-हाडा व्यक्ती .................................... २४

**स्वयंभू अशा गुणोत्कर्षामुळे सर्व काळाकरिता सर्वांना आदरणीय ठरलेली ही थोर व्यक्तिमत्वे ! या व अशा सर्वांच्या सद्गुणांची आठवण आपण सतत ठेवू !**

१. परमपुज्य - वासुदेवानंद सरस्वती तथा - गणेश वासुदेव टॅंब्येस्वामी महाराज - माणगांव
२. रणरागिणी - लक्ष्मीबाई नेवाळकर - झांशी
३. श्री. रंगावधूत वळामे महाराज - पूज्यश्री बापूजी - अहमदाबाद
४. हेमाडपंत - पैठण/देवगिरी
५. ब्रह्मर्षी पं. श्रीपाद दामोदर सातवळेकर - सावंतवाडी
६. वेदसम्राट - सखाराम महेश्वर भट्ट पाध्ये - लांजा
७. विद्वद्रत्न पं. वासुदेव लक्ष्मणशास्त्री पणशीकर - गोवा
८. धर्मसिंधुकार बाबाभट्ट पाध्ये - राजापूर / संगमेश्वर
९. विद्यारत्न - दत्तात्रेयशास्त्री निंगुडकर - राजापूर
१०. व्याकरणरत्न - बाळकृष्ण गणेश हर्डीकर - रत्नागिरी
११. आचार्य - रघुनाथ गणेश हर्डीकर - रत्नागिरी
१२. डॉ. एस्.के.बेलवलकर - मुंबई
१३. महमहोपाध्याय - वासुदेव विष्णु मिराशी - नागपूर
१४. महामहोपाध्याय - दत्तो वामन पोतदार - पुणे
१५. डॉ. वि.श्री. वाकणकर - उज्जयिनी
१६. डॉ. शंकर बाळकृष्ण दीक्षित - **Archiological Survey of India** चे पहिले डायरेक्टर जनरल
१७. श्री. राजारामशास्त्री भागवत - राजापूर
१८. श्री. शंकर श्रीकृष्ण देव - धुळे
१९. श्री. बाळशास्त्री जांभेकर - मुंबई
२०. श्री. सखाराम गणेश देउस्कर - कलकत्ता
२१. श्री. ह.रा.महाजनी - सातारा
२२. श्री. प्रभाकर पाध्ये - लांजा
२३. श्री. ग. त्र्यं माडखोलकर - नागपूर
२४. श्री. श्री.रा.टिकेकर - मुंबई
२५. श्री. गोविन्द तळवलकर - मुंबई
२६. आचार्य - शंकरराव जावडेकर - पुणे
२७. श्री. त्र्यंबक शंकर शेजवलकर - मुंबई
२८. श्रीमती - दुर्गा भागवत - मुंबई
२९. सौ. प्राजक्ताताई अमृते - डोंबिवली
३०. श्री. शंकरराव देव - पुणे
३१. श्री. बाबुराव पराडकर - वाराणसी
३२. श्री. विष्णु सखाराम खाण्डेकर - कोल्हापूर
३३. श्री. मोरोपन्त पराडकर - बारामती
३४. श्री. भास्कर रामचंद्र ताम्बे - इंदूर

| | | |
|---|---|---|
| ३५. श्री. यशवन्त दिनकर पेण्ढारकर | - | बडोदा |
| ३६. श्री. बळवन्त पाण्डुरंग तथा अण्णासाहेब किर्लोस्कर | - | पुणे |
| ३७. श्री. वि. सी. गुर्जर | - | कशेळी |
| ३८. श्री. वसन्त शंकर कानेटकर | - | नाशिक |
| ३९. श्री. आनन्द साधले | - | मुंबई |
| ४०. श्री. श्रीपादशास्त्री किंजवडेकर | - | पुणे |
| ४१. श्री. गोविन्दराव टेंब्ये | - | कोल्हापूर |
| ४२. श्री. स्वरभास्कर - भास्कर बुवा बखले | - | बडोदा |
| ४३. श्री. यशवंतबुवा मिराशी | - | पुणे |
| ४४. श्री. जितेंद्र अभिषेकी | - | गोवा |
| ४५. श्रीमती सुमती मुटाटकर | - | नागपूर |
| ४६. श्री. श्रीकांत बाक्रे | - | कलकत्ता |
| ४७. श्री. सुरेश तळवलकर | - | मुंबई |
| ४८. श्री. दाजी भाटवडेकर | - | मुंबई |
| ४९. श्री. शरद तळवळकर | - | पुणे |
| ५०. श्री. श्रीकान्त मोघे | - | पुणे |
| ५१. श्री. प्रभाकर पणशीकर | - | मुंबई |
| ५२. श्रीमती स्मिता तळवळकर | - | मुंबई |
| ५३. श्रीमती रिमा भडभडे | - | मुंबई |
| ५४. श्रीमती इला भाटे | - | मुंबई |
| ५५. श्री. राजा नवाथे | - | लांजा / मुंबई |
| ५६. श्री. हर्षवर्धन नवाथे | - | मुंबई |
| ५७. श्री. चारुदत्त सरपोतदार | - | पुणे |
| ५८. श्री. शंतनु शेवडे | - | बडोदा |
| ५९. श्री. स्वामी चक्रधर | - | फलटण |
| ६०. श्री. माधवरावजी मुळये | - | नागपूर |
| ६१. श्री. परमपूज्यश्री. माधव सदाशिव गोळवलकरगुरुजी | - | नागपूर |
| ६२. श्री. माधवरावजी सप्रे | - | रायपूर |
| ६३. श्रीमती इंदिराबाई हळबे | - | देवरुख |
| ६४. श्री. रामकृष्ण शंकर ताटके | - | मुंबई |
| ६५. पद्मभूषण - डॉ. एन्.एस्.हर्डीकर | - | घटप्रभा |
| ६६. राजरत्न - दाजीसाहेब तांबे | - | बडोदा |
| ६७. श्री. बाळगंगाधर खेर | - | मुंबई |
| ६८. श्री. गणेश वासुदेव मावळंकर | - | अहमदाबाद |
| ६९. श्री. भारतरत्न गोविन्द वल्लभपंत पराडकर | - | गढवाल |
| ७०. रँग्लर - ग.स. महाजनी | - | सातारा |
| ७१. रँग्लर - वि.वा.नारळीकर | - | कोल्हापूर |
| ७२. रँग्लर - जयन्त नारळीकर | - | कोल्हापूर |
| ७३. श्रीमती - यमुनाबाई हिर्लेकर | - | मुंबई |
| ७४. रियासतकार - गो.वा.सरदेसाई | - | पुणे |

| | |
|---|---|
| ७५. श्री. - व्ही. एस्. हर्डीकर | - कानपूर |
| ७६. श्री. नानासाहेब नारळकर | - पुणे |
| ७७. श्री. रामकृष्ण हरी तथा दादासाहेब भडकमकर | - मुंबई |
| ७८. श्री. नंदू नाटेकर | - मुंबई |
| ७९. श्री. मनोहर हर्डीकर | - मुंबई |
| ८०. श्री. चंदू सरवटे | - इंदोर |
| ८१. श्री. गौरव नाटेकर | - पुणे |
| ८२. श्री. संदीप कीर्तने | - पुणे |
| ८३. श्रीमती अपर्णा फळणीकर | - मुंबई |
| ८४. श्री. नितीन कीर्तने | - पुणे |
| ८५. श्री. लक्ष्मणराव किर्लोस्कर | - किर्लोस्करवाडी |
| ८६. श्री. शंतनुराव किर्लोस्कर | - पुणे |
| ८७. श्री. पी.एम्.बरवले ICS पहिले डायरेक्टर जनरल, इंडियन रेल्वेचे पहिले कमिशनर | - दिल्ली |
| ८८. श्री. ठाकूरदेसाई - ICS - पहिले ICS | - दिल्ली |
| ८९. श्री. सखाराम हरिश्चंद्र भाटवडेकर - सावेदादा | - मुंबई |
| ९०. श्री. वा. वि. चिरमुले | - सातारा |
| ९१. श्री. वाखले, संगीतातलं वाखले घराणं; व्हायोलिनिस्ट जोग यांचे शिष्य | - सागर |
| ९२. श्रीमती कुसुम आगटे | - दिल्ली |
| ९३. श्री. नानासाहेब पुराणिक | - पनवेल |
| ९४. श्री. दत्तात्रेय कृष्ण सांडू | - चेंबूर |
| ९५. श्री. पुरुषोत्तमशास्त्री नानल | - पुणे |
| ९६. श्री. गंगाधरशास्त्री गुणे | - नगर |
| ९७. श्री. गोपाळराव देउस्कर | - पुणें |
| ९८. श्री. माधवराव सातवळेकर | - मुंबई |
| ९९. श्री. गोपाळ गुर्जर | - मुंबई |
| १००. श्री. केशव भिकाजी ढवळे | - मुंबई |
| १०१. श्री. ग. का. रायकर | - मुंबई |
| १०२. श्री. गोविन्द रामचंद्र मोघे | - मुंबई |
| १०३. श्री. गोविन्द पन्त बुंदेले | - सागर |
| १०४. श्री. विसाजी पंत विनीवाले | - पुणे |
| १०५. श्री. लक्ष्मण बळवंत भोपटकर | - पुणे |
| १०६. श्री. पुरुषोत्तम गणेश मावळंकर | - अहमदाबाद |
| १०७. श्री. सीतारामपंत खेर | - लखनौ |
| १०८. श्री. श्रीनिवास सरदेसाई | - मुंबई |
| १०९. श्री. कृष्णचन्द्र गोविन्द पन्त पराडकर | - दिल्ली |
| ११०. श्री. शंकर वामन आघारकर | - पुणे |
| १११. श्री. गं.द. आंबेकर | - मुंबई |
| ११२. डॉ. भाऊसाहेब सातवळेकर | - हैदराबाद |

११३. श्री. गोपाळ गणेश तथा दादासाहेब शेंबेकर
११४. श्री. नानासाहेब गुर्जर - बारामती
११५. श्री. गजानन पेंढारकर - हरिहर
११६. श्री. आप्पासाहेब कोटिभास्कर - नागपूर
११७. श्री. अरविन्द देव - मुंबई
११८. श्री. मोहन कात्रे - पुणे
११९. श्री. अच्युत श्रीधर वाखले DG. Telephone Dept. - पुणे
१२०. श्रीमती मालती तांबे वैद्य - दिल्ली
१२१. श्री. पुसाळकर - पश्चिम रेल्वे प्रमुख - नागपूर
१२२. श्री. नारव्ये - मुंबई
१२३. श्री. आचार्य स.ज.भागवत - डोंबिवली
१२४. श्री. अरूण टिकेकर - पुणे
१२५. श्री. विजय कुवळेकर - मुंबई
१२६. श्री. अनन्त गोपाळ शेवडे - पुणे
१२७. श्री. रामचंद्र सप्रे - पहिली राष्ट्रीय बुद्धीबळ स्पर्धा विजेते - नागपूर
१२८. श्री. माधवराव गोठोस्कर - मुंबई
१२९. श्री. उमेश लळित - मुंबई
- दिल्ली

- विभिन्न अशा पंचाहत्तरहूनही अधिक मानवी कर्तबगारीच्या क्षेत्रांत सर्व मिळून हजार बाराशे नांवे सहज मिळतात. या समाजातल्या कर्तबगार व्यक्तींचे त्यांच्या लोकसंख्येशी प्रमाण २७ ते २८ टक्के पडते. इतर पुढारलेल्या समाजात ते १७ ते १८ टक्के आहे.
- वर दिलेली नांवे फक्त प्रातिनिधिक आहेत. जशी आठवली तशी लिहिली त्यामुळे काही वय - ज्ञान - मान परत्वे श्रेष्ठ - ज्येष्ठ - गरिष्ठांची नावे खालीवर झाली असतील ती क्षम्य समजावीत. कारण त्यांत लबाडीचा हेतू नाही.
- संख्या एवढीच; असे नव्हे (ती माझ्या जवळ साडेअकराशेच्या आसपास आहे.) गुण संपले म्हणून तर नव्हेच नव्हे; तर, लेखकाची लिहिताना दमछाक झालेली आहे; हे कृपया लक्षात घ्यावे म्हणून तर आवरते घ्यायचे. ज्यांची नावे राहिली त्यांनी क्षमा करावी.
- संख्येने कमी असलेली पण भुरळ घालणा-या अनेक उत्तम गुणांनी भ्राजमान असलेलीं हीं व अशीं व्यक्तिमत्वें सदैव आपल्याभोवतीं असतांना; वर्षांतून एकादेवेळीं होणा-या संमेलनाचे अध्यक्षपदी किंवा प्रमुख पाहुणे म्हणून आमच्या ज्ञाती विषयीं कांहींच प्रेम किंवा अभ्यास नसलेल्या परंतु सोईच्या व जवळच्या क-हाडा नसलेल्या व्यक्तीला निवडण्यांत परगुणांविषयींच्या प्रेमापेक्षा, अधिक गुणवान पण स्वाभिमानी स्वकीयांना दूर लोटण्याचीं आमची तयारी आहे; याची तसेच आमच्यातल्या गुणवान मंडळींची संख्या; आमच्या मतें आटल्याची, ती प्रकट जाहिरात होते, हेही आपण लक्षात घेऊ या.

अवधूत रघुनाथ हर्डीकर

## गुणवान क-हाड्यांची स्मृति जागवणाऱ्या काही संस्था, पुरस्कार वगैरे

१. 'हिन्दुस्थानी सेवादल' - स्थापना १९२३ नागपूर, संस्थापक डॉ. एन्.एस्.हर्डीकर.
२. विदर्भ साहित्य संस्कृति मण्डळ - संस्थापक डॉ. वॉं.वि.मराशी व श्री. ग.त्र्यं. माडखोलकर - नागपूर.
३. नागरी प्रचारिणी सभा - वाराणसी - संस्थापक श्री. माधवराव सप्रे - रायपूर.
४. किर्लोस्करवाडी - श्री. लक्ष्मणराव किर्लोस्कर .
५. तळवलकर जिम्नॅस्टस् - मुंबई.
६. श्रीराम संगीत महाविद्यालय - संस्थापक श्री. शंकरराव सप्रे - नागपूर.
७. माधवराव सप्रे समाचार पत्रसंग्रहालय - कमलापार्क - भोपाळ.
८. मावळंकर हॉल - लोकसभागृह - नवी दिल्ली.
९. हर्डीकर बाग - हैदराबाद (निजामच्या अपत्यांचे गुरु हर्डीकरांच्या स्मृत्यर्थ) त्यावेळचा पगार दरमहा एक किलो चांदी.
१०. रामकृष्ण ट्रस्ट - संस्थापक श्री. रामकृष्ण शंकर ताटके.
११. पं. गोविन्द वल्लभपंत होमगार्ड व नागरी संरक्षण प्रशिक्षण महाविद्यालय, मुंबई.
१२. 'दृष्टिकोन' - डॉ. कीर्तने यांची समाजोपयोगी संस्था, इंदूर.
१३. 'मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय' - इतिहासकार शेजवलकरांचे वडील श्री. शंकरराव शेजवलकरांनी उभारलेली संस्था.
१४. मातृसेवा संघ - देवरूख - श्रीमती इंदिराबाई हळबे यांची संस्था.
१५. आघारकर इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स - डॉ. शंकरराव आघारकरांची संस्था.
१६. प्राचार्य एन्.जी. नारळकर इन्स्टिट्यूट ऑफ करिअर डेव्हलपमेंट - पुणे.
१७. परमपूज्य माधव सदाशिव गोळवळगुरुजी अॅवार्डस् - शौर्य सामाजिक कार्य आणि साहित्य या तीन क्षेत्रांत प्रत्येकी एकावन्न हजारांची अॅवार्डस् दरवर्षी दिली जातात.
१८. दादासाहेब शेंबेकर अॅवार्ड - शेतीसाठी - पुणे विद्यापीठ देते.
१९. उत्तम नटासाठी दिले जाणारे वसंतराव कानेटकर हे दरवर्षी २५,०००/- रु. चें अॅवार्ड - नाशिक.
२०. काकासाहेब टिकेकर स्मृतिस्पर्धा - सांगली - बुद्धिबळ स्पर्धा.
२१. आयुर्वेद रसशाळा - पुणे - वैद्य - पुरुषोत्तमशास्त्री नानलांची
२२. धूतपापेश्वर आयुर्वेदिक औषधे - पनवेल - वैद्य नानासाहेब पुराणिक.
२३. सांडू औषधे - चेंबूर - श्री. द.कृ.सांडूंची संस्था
२४. 'आफालि' नगर श्री. गंगाधर शास्त्री गुणे यांची संस्था
२५. संगीतातले 'वाखले घराणें', - सागर
२६. हेमाडपंती देवालयांचे 'हेमाडपंत' ..... असे अनेकानेक

## क-हाडे आणि क-हाडे

१. इसवी सन ११६५ पर्यंत कृष्णा ते कावेरी नद्यांमधल्या अति विस्तीर्ण प्रदेशांत विखुरलेले होते.
२. इसवी सन ११५१ ते ११६८ पर्यंत कर्नाटकांत स्मार्त - वैष्णव - जैन पंथीयामधें त्रिकोणी भीषण हिंसक हिंसाचार झाले.
   अराजक होते म्हणून ते कृष्णा - कोयना - तुंगभद्रा नद्यांमधें एकवटले आणि याचवेळेपासून खरी वेगळी अशी **Distinctive Identity** क-हाड्यांना प्राप्त झाली हे पहिलें स्थलांतर
३. दुसरें स्थलांतर कोकणात, कृष्णा - कोयना दुआबातून बाराव्या शतकांत केव्हांतरी झालें शिलाहार राजांच्या

राजवटींत 'क-हाडे ब्राह्मण' संज्ञा लोकप्रिय झाली. - बहामनीच्या काळांतही क-हाड्यांनी कर्तृत्व गाजवलें. देसाई - सरदेसाई - अधिकारी पोतदार - सरपोतदार - सबनीस - सरदेशपांडे ही अधिकारदर्शक विभिन्न नावं मिळालीं - हे दुसरें स्थलांतर! पण बरेच लोक त्या त्या प्रदेशातही राहिले.

४. गोविन्दपन्त खेरांमुळें (बुंदेले) क-हाड्यांचें उत्तरेकडे स्थलांतर झालें. त्यामुळे बुंदेलखेड, विदर्भ - व-हाड - मध्यप्रदेश - ओरिसा, उत्तरप्रदेश, बिहार - महाकोशल प्रदेशांत तिसरे स्थलांतर झाले.

५. बहुतेक क-हाडे - स्मार्तमताचे अनुयायी, अद्वैतमतानुयायी, ऋग्वेदी, आश्वलायन सूत्री, शाकल शाखेचे आहेत.

६. एकूण चोवीस गोत्रें व पांचशे सेहेचाळीस आडनावें आहेत. त्यापैकी दोनशे चोवीस 'कर' प्रत्ययानें शेवट होणारीं आहेत.

७. ज्या जमातीविषयीं फार प्राचीन काळापासून उल्लेख मिळतात अशी ही महाराष्ट्रातली एकमेव जमात. (हे उल्लेख इसनवीसनाच्या तिस-या शतकापासून आहेत असें नानासाहेब गोरे यांनी सरदेसाई घराण्याच्या प्रस्तावनेत म्हटले आहे)

८. क-हाड्यांविषयी त्यांचे गुणांचे कांहींनीं दर्शन घेतलेंय

- 'क-हाडे टापटिपीनें वागणारे, सफाईदार व व्यवहार चतुर असतात' - न.चिं.केळकर.
- 'क-हाड्यांमधें कर्तव्यदक्षता, एकमार्गीपणा, स्वाभिमान हे गुण आढळतात' - पं. महादेवशास्त्री दिवेकर.
- 'जिथल्या तिथे, जेव्हांचे तेव्हां, जशास तसें हे क-हाड्यांच्या यशाचे सूत्र आहे' - धा.गं.टिळक
- 'तुटे वाद संवाद तो हीतकारी असे कौशल्य क-हाडे ब्राह्मणांत दिसून येते' - चंद्रशेखर फडणीस.

९. Whatever disqualifications may, in theory attached to chitpawans, their present social and religious position is, as high, as that of Karhade or any other branch of Deccan Brahmins" - Dr. Enthoven - District Gazettier.

१०. क-हाड्यांएवढेच चित्पावनांचे सामाजिक आणि धार्मिक स्थान उच्च दर्जाचें आहे हें सांगतांनां, एकाद्या गुणांची उंची सांगण्यासाठीं हिमालयाचं उपमान सापडावं तसं 'क-हाडे' हेंच उपमान म्हणून डॉ. एन्थोवेन्‌ला गवसलं. क-हाडे उपमान होते; उपमेय नव्हते हें यावरून समजतें. हे आपण नीट लक्षात ठेवू या; आणि दुस-यांच्या तुलनेत आपण फार कमी आहोत अशी कांहीं वेळां जी न्यूनगंडाची भावना आपल्यापैकी कांहींना येत असते; ती झटकून टाकू या.

अवधूत हर्डीकर
एम्.ए.काव्यतीर्थ,
आय.बी.एस् (निवृत्त)
१६ ए, गणेशकृपा सोसायटी, परमहंसनगर, पौडरोड, पुणे ४११ ०३८.

<u>संदर्भ :-</u>

१. डिस्ट्रिक्ट गॅझेटियर - रत्नागिरी डिस्ट्रिक्ट -
२. क-हाडे ब्राह्मणांचा इतिहास - लेखक विष्णु वामन आठल्ये, शिपोशी
३. सरदेसाई घराण्याचा इतिहास.
४. 'तरुण भारत - नागपूर' दि. २३.३.१९८० आणि २६.४.१९९८.
५. याशिवाय अनेक दैनिकें, नियतकालिकें यांमधून येणारे वाड्मय / विचारधन.
६. स्वार्थभावना विरहित, मानवी व्यवहार कलापांच्या जाणिवेतून साकारलेलें, स्वत:चें तर्काधिष्ठित चिन्तन.
७. जर्नल ऑफ कलिंग हिस्टॉरिकल रिसर्च सोसायटी, व्हॉल्यूम II नं. २ लेखक - डॉ. पी.के.गोडे.